महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**(CIN NO. U40109MH2005SGC153646)**


**प्रेषक,**
अधिक्षक अभियंता,
अऊदा प्रकल्प मंडळ, अमरावती
प्रकाश सरीता, ए - विंग, २ रा मजला, प्रशासकिय इमारत,
२२० केव्ही उपकेंद्र परिसर, मोर्शी रोड, अमरावती-४४४ ६०३
फोन नं. ०७२१-२६६९१७२ ईमेल आयडी - se1600@mahatransco.in


संदर्भ नं. महापारेषण /अ.अ/अऊदा/प्रकल्प/मंडळ/अम/तां/ No - 860 दिनांक: 19 DEC 2023

## सुचना

महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीच्या अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, अमरावती कार्यालयामध्ये वर्ष २०२३-२४ करिता बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार सहाय्यक तंत्रज्ञ अउदा वाहिनी प्रकल्प उपविभाग, खामगांव (०१) व अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, खामगांव (०१) नियुक्त करण्याकरिता, अमरावती बेरोजगारांनी स्थापन केलेल्या नोंदणीकृत सेवा सहकारी संस्थाकडून खालील अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. संस्थेने अर्ज सादर करतांना अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :-

अ) अर्ज सादर करणा-या संस्थेने संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, ई- मेल व दुरध्वनी क्रमांक.
आ) ठेकेदादाचे नाव, त्याचा कायमस्वरुपी पत्ता व रहिवाशी दाखला.
इ) सुशिक्षित बेरोजगार संस्थेचे नोंदणी पत्र.
ई) कंत्राटी कामगार पुरविण्याचा परवाना.
उ) कामगार राज्य विमा योजनेचा कोड नंबर.
ऊ) भविष्य निर्वाह निधीचा नोंदणी क्रमांक व कोड नंबर.
ऋ) व्यवसाय कर क्रमांक.
ल) GST क्रमांक.
ऍ) मुंबई दुकाने व अस्थापन अधिनियम क्र. १९४८ अंतर्गत व्यवसाय परवाना.
ऐ) कांत्राटदार संस्थेचे बॅंकेचे नाव, पत्ता खाते क्रमांक व PAN क्रमांक.

२. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. २८.०९.२०१० च्या महाराष्ट्र शासन राजपत्र -१ मध्ये प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकानुसार किमान वेतन दर, तसेच कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रकाप्रमाणे विशेष भत्ते आणि महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्र. १४२ दि. ०३.०१.२०१४ प्रमाणे किमान अधिभार समाविष्ट करून आलेल्या दारावरच कंत्राटी कामगार पुरविण्याचे हमीपत्र संस्थेस द्यावे लागेल.

३. संस्थेस महापारेषण कंपनीच्या परिपत्रक क्र. १४२ दि. ०३.०१.२०१४ मधील सूचनांचे तंतोतंत पालन करावे लागेल.

४. कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगारांच्या व्याख्या महापारेषण परिपत्रक क्र. १४२ दि.०३.०१.२०१४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असतील.

५. वर्ष २०२३-२४ करिता बाहयस्त्रोत पध्दतीने कंत्राटी कामगार नियुक्त करण्याच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | सहाय्यक तंत्रज्ञ | एकुण |
|---|---|---|---|
| १ | अउदा वाहिनी प्रकल्प उपविभाग, खामगांव | ०१ | ०२ |
| २ | अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, खामगांव | ०१ | |

वरीलप्रमाणे अटी व शर्तीची पूर्तता करून भरलेले अर्ज अति उच्च दाब प्रकल्प मंडळ कार्यालय, अमरावती येथे दि. २७.१२.२०२३, सांयकाळी ०५.०० (शनिवार, रविवार व सुटट्ीचे दिवस सोडुन) पर्यंत स्वीकारण्यात येतील. दि.२७.१२.२०२३ सायंकाळी ०५.०० नंतर अर्जांचा प्रत्यक्ष कामवाटपात विचार केल्या जाणार नाही वरिल अटी व शर्ती मधील नमुद केलेल्या कागदपत्रांच्या पुर्ततेमध्ये त्रुटी आढळल्यास, सदर संस्थेच्या अर्जाबाबत सक्षम अधिका-याने घेतलेला निर्णय अंतिम असेल याची कुपया नोंद घेण्यात यावी. एकापेक्षा अधिक संस्थाचे अर्ज विहित कालमर्यादेत प्राप्त झाल्यास लॉटरी पध्दतीने कामाचे वाटप करण्यात येईल. महापारेषण कंपनीचे परिपत्रक क्र. १४२ दि. ०३.०१.२०१४ उच्च दाब प्रकल्प मंडळ, अमरावती येथे संदभार्थ उपलब्ध आहे.

(सौ. प्रणीती रा. देशमुख)
अधिक्षक अभियंता
अउदा प्रकल्प मंडळ, अमरावती.

D:\HR dt. 28.07.2022\Technical Section-MARATHI.docx